# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 368/2022 दिनांक : 23.09.2022**

## 1)घरफोडी :–

**1)हिमायतनगर :–** दिनांक 21.09.2022 रोजी 21.00 ते दिनांक 22.09.2022 चे 05.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहाते घरी मौ. गणेशवाडी ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या राहत्या घराचे कुलूप तोडुन आत प्रवेश करून घरातील लोखंडी पेटीतील नगदी 20,000/–रूपये, व सोन्याचे दागीने असा एकुण 71,200/–रूपयाचा ऐवज कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी माधव मारोती जाधव, वय 55 वर्षे, व्यवसाय शेती रा. गणेशवाडी ता. हिमायतनगर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरन 211/2022 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/राठोड, मो.क्रं. 9112141791** हे करीत आहेत.

## 2)मो. सा. चोरी :–

**1)शिवाजीनगर :–** दिनांक 05.09.2022 रोजी 22.00 ते दि. 06.09.2022 चे 06.00 वा. चे दरम्यान, **विष्णुनगर नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो होंडा कंपणीची प्लेझर स्कुटी क्रं एमएच–26/वाय–3301 किंमती 20,000/–रूपयाची रोडवर लावुन झोपी गेला असता कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी आशोक भिमराव गळेगावे, वय 54 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. विष्णुनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरन 353/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2141 मोरे, मो.क्रं. 8208062971** हे करीत आहेत.

## 3)फसवणुक :–

**1)किनवट :–** दिनांक 29.07.2022 रोजी 10.00 वा. चे सुमारास, **मौ. गोकुंदा ता. किनवट जि. नांदेड, येथे,** यातील फिर्यादीने मोबाईलवर गुगलवर एसबीआय क्रेडीट कार्ड कस्टमर सर्विस मधील नंबर सर्च केला असता त्यांचे मोबाईलवर 9883736075 हा नंबर आला. यातील फिर्यादीने कॉल केला असता समोरील व्यक्तीने आपल्या समस्या सांगुन समस्या सोडविण्यासाठी फिर्यादीने एसबीआय क्वि सपोर्ट ॲप घेण्यास सांगीतले त्यांनी आयडी विचारून फिर्यादीचा नंबर हॅग केला. क्रेडीट कार्ड क्र मधुन 92,115/–रूपये बचत खाते मधुन 50,000/– असे एकुण 1,42,115/–रूपये अज्ञात आरोपीने ऑनलाईन पैसे काढुन घेवुन फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी रमेश भानुदास आंधळे, वय 42 वर्षे, व्यवसाय शिक्षक मौ. चिखली बु. जि. प. शाळा रा. गोकुंदा ता. किनवट** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरन 188/2022 कलम 420, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1952 कल्लाळे, मो.नं. 7709711952** हे करीत आहेत.

**2)देगलूर :–** दिनांक 22.09.2022 रोजी 11.05 वा. चे सुमारास, **गांधी चौक देगलूर ता. देगलूर जि. नांदेड, येथे,** यातील फिर्यादी व त्यांची पत्नी असे साठे चौक देगलुर येथुन पेठअमरापुर गल्ली देगलुर येथील मेव्हण्याचे घरी जाण्यासाठी पायी जात असतांना गांधी पुतळया जवळ आले असता दोन अनोळखी इसमांनी फिर्यादीस पोलीस असल्याचे सांगुन व पोलीसांचे आयडीकार्ड दाखवुन, तोतयागीरी करून फिर्यादीकडील सोन्याचे दागीने किंमती 60,000/–रूपयाचे आरोपीचे हातातील कादावर ठेवण्यास सांगुन घेवुन पळुन जावुन फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी गोपाल रामचंद्र ओंमकारे, वय 65 वर्षे, व्यवसाय रिटायर्ड रेल्वे कर्मचारी रा. भोईर चाळ रूम नं 16 पोखरण रोड नं 1 लक्ष्मीनगर जि. ठाणे,** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन वरून **पोस्टे देगलूर** गुरन 446/2022 कलम 420, 170, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री सुर्यवंशी, मो.नं. 9821159844** हे करीत आहेत.

## 4)आत्महत्येस प्रवृत केले :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 22.09.2022 रोजी 00.11 वा. चे सुमारास, **गुरू गोविंदसिंघजी अभियांत्रिक महाविद्यालय कॉलेज विष्णुपुरी, नांदेड येथे,** यातील **मयत नामे गिता कल्याण कदम, वय 21 वर्षे, व्यवसाय शिक्षण अभियांत्रीकी महाविद्यालय विष्णुपूरी रा. वाडी बामणी ता. जि. उस्मानाबाद,** हीस तिच्या वर्गात शिकत असलेला आरोपी तिचे फोटो काढुन तिला ब्लॅक मेल करून माणसीक त्रास दिल्यामुळे आरोपीचे त्रासाला कंठाळुन गळफास घवुन आत्महत्या केली. तिचे आत्महत्येस यातील नमुद आरोपीने प्रवृत केले. वगैरे **फिर्यादी ज्ञानेश्वर कल्याण कदम, वय 24 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. वाडी बामणी ता. जि. उस्मानाबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 569/2022 कलम 306, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री महेश कोरे, मो.नं. 8888836607** हे करीत आहेत.

## 5)जुगार :–

**विमानतळ :–** दिनांक 22.09.2022 रोजी 16.10 वा. चे सुमारास, **विमानतळ रोड हातोडा चौक महाराष्ट्र चिकन सेंटर जवळील मोकळया जागेत नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना 3420/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोह/3084, गणेश रामकृष्ण धुमाळ, ने. स्थागुशा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 320/2022 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2317 पावडे, मो.क्र. 8888842002** हे करीत आहेत.

## 6)उपचारा दरम्यान मृत्यु :–

**इतवारा :–**दिनांक 22.09.2022 रोजी 07.15 वा. चे सुमारास, **सरकारी दवाखाना विष्णुपूरी नांदेड येथे,** यातील **मयत नामे रूकसाना बेग भ्र. शेरखान पठाण, वय 35 वर्षे, व्यवसाय मिस्त्री काम रा. इस्लामपुरा नांदेड**, ही बाळांतपणासाठी स द विष्णुपूरी येथे शरीक झाली असता उपचारा दरम्यान मरण पावली. वगैरे **खबर देणार जावेदखान पि. जुम्माखान पठाण, वय 35 वर्षे, व्यवसाय मिस्त्री काम रा. इस्लामपुरा नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे इतवारा** आ. मृ. **20**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/असद शेख, मो.नं. 9405000786** हे करीत आहेत.

## 7)विषारी औषध पिवून आत्महत्या :–

**नायगांव** :–दिनांक 15.09.2022 रोजी 07.00 ते 10.00 वा. चे दरम्यान, **गंगाधर मेटकर यांचे शेतात मौ. मांजरम ता. नायगांव जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे नागोराव विश्वांभर गायकवाड, वय 37 वर्षे, रा. मांजरम ता. नायगाव जि. नांदेड,** हा शेतातील वानरे हाणतो असे म्हणुन मो सा ने शेताकडे गेला व आई–वडिलांनी शेतीवर उचललेले कर्ज कसे फेडावे व सतत नापीकी होत असल्याने कोणतेतरी विषारी औषध पिवून आत्महत्या केला. वगैरे **खबर देणार विश्वांभर माधव गायकवाड, वय 70 वर्षे, व्यवसाय शेती रा. मांजरम ता. नायगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे नायगांव** आ.मृ. **35**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/वाघमारे, मो.नं. 9096618241** हे करीत आहेत.

## 8)पाण्यात बुडून मृत्यु :–

**मनाठा :–** दिनांक 19.09.2022 रोजी 16.00 वा. चे सुमारास, **मौ. कारला शेत शिवारातील तळयात ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे दिलीप गंगाधर कपाटे, वय 35 वर्षे, रा. कारला ता. हदगाव जि. नांदेड,** हा तळयात मासे धरण्यासाठी गेले असता पाण्यात बुडून मरण पावला. वगैरे **खबर देणार बालाबाई दिलीप कपाटे, वय 33 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. कारला ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे मनाठा** आ. मृ. **27**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2123 गिरी, मो.नं. 9767747774** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड